# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहमदनगर

## मोफत गणवेश

**उद्देश -** समग्र शिक्षा सन २०१९-२० मध्ये पूर्वी प्रमाणेच शाळा व्यवस्थापन समिती(SMC) मार्फत गणवेश खरेदी करुन विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे. या आर्थिक वर्षात इ.१ली त इ.८ वी च्या लाभार्थी विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी रु.३००/- या दराने दोन गणवेश संचासाठी रु.६००/-अनुदान मंजूर आहे.

इयत्ता १ ली ते ८ वी चे शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती/जमाती मुले तसेच दारिद्र्य रेषेखालील सर्व संवर्गातील पालकांची मुले हे या योजनेचे लाभार्थी आहेत.

**गणवेश योजना अंमलबजावणी साठीच्या सूचना खालीलप्रमाणे -**

१. शाळा व्यवस्थापन समित्यांना अनुदान वितरण करताना विलंब होऊ नये म्हणून तालुकास्तरावरुन थेट शाळाव्यवस्थापन समिती स्तरावर अनुदान वितरण करण्यात येते.
२. राज्य शासनाचे सामाजिक न्याय विभाग,आदिवासी विभाग,अल्पसंख्यांक विभागांमार्फत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गणवेश अथवा शासनमान्य वसतीगृहातील विद्यार्थ्यांना गणावेशाचा लाभ दिला जात असल्यास त्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अंतर्गत गणवेश उपलब्ध करुन देण्यात येऊ नये,जेणेकरुन एकाच विद्यार्थ्यास दुबार गणवेशाचा लाभ देण्यात येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
३. गणवेशाचा रंग,प्रकार,स्पेसिफिकेशन इ.बाबी संबंधित शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीने ठरवावे. राज्य,जिल्हा व तालुका स्तरावर गणवेशाचा रंग,प्रकार,स्पेसिफिकेशन इ कोणताही निर्णय घेण्यात येऊ नये.
४. गणवेश पुरवठ्याबाबत संपूर्ण अधिकार संबंधित शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीस असल्याने शाळा व्यवस्थापन समितीपेक्षा कोणत्याही वरच्या (केंद्र,तालुका व जिल्हा)स्तरावरुन गणवेश पुरवठ्याबाबत कोणतेही निर्णय घेण्यात येऊ नयेत.
५. प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्या शाळेतील गणवेश पात्र लाभार्थ्यांच्या वयोगटानुसार व विद्यार्थ्यांच्या मापानुसार(size प्रमाणे)मुलांसाठी आणि मुलींसाठी गणवेश खरेदी करुन वितरीत करण्यात यावे.
६. गणवेशावरील शिलाई पक्क्या धाग्याची असावी.शिलाई निघाल्यास,गणवेशाचे कापड फाटल्यास अथवा गणवेशाबाबत कोणतीही तक्रार उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीची असेल.

सबका साथ सबका विकास
समग्र शिक्षा

७. मंजूर तरतूदीपेक्षा जास्त खर्च झाल्यास खर्च मान्य केला जाणार नाही.याची दक्षता संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने घेणे आवश्यक आहे.मंजूर तरतूदीपेक्षा जादा खर्च झाल्यास जादा झालेला खर्च मान्य केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

८. गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील शाळा व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्ष व शाळा मुख्याध्यापकांची बैठक घेऊन समग्र शिक्षा अंतर्गत मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात मार्गदर्शन करावे.

९. गणवेश खरेदी देयकांची अदायगी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने धनादेशाद्वारे करावी.गणवेश पुरवठादारास रोख स्वरुपात अदायगी करु नये.अदायगी केल्याबाबतचे अभिलेखे,धनादेशाची झेरॉक्स प्रत व संपूर्ण हिशोबाच्या अचूक नोंदी तसेच दस्तऐवज जतन करुन ठेवावेत परिक्षणावेळेस,लेखापरिक्षकास संपूर्ण दिनांकासह हिशोबाची माहिती व अभिलेखे,उपलब्ध करुन देता येईल या प्रमाणे लेखा विषयक बाबींच्या नोंदी ठेवण्यात याव्यात.

१०. शाळास्तरावर स्टॉक रजिस्टर ठेवण्यात यावे.सदर रजिस्टरमध्ये गणवेश वितरणाचा दिनांक व गणवेश मिळाल्याबाबत संबंधित लाभार्थी विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा घेणे आवश्यक आहे.

११. गणवेशाबाबत संपूर्ण कार्यवाही झाल्यानंतर मंजूर तरतूदीमधील रक्कम शिल्लक असल्यास,सदर रक्कम त्याच वित्तीय आर्थिक वर्षात जिल्हा स्तरावर जमा करावी व त्याबाबतची नोंद ठेवण्यात यावी.

१२. गणवेश वितरणासाठी विलंब होणार नाही व गणवेश पात्र लाभार्थी सदर योजनेच्या लाभासाठी वंचित राहणार नाही याची दक्षता संबंधित शाळा व्यवस्थापन समिती,शिक्षण विस्तार अधिकारी,गट शिक्षण अधिकारी, शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांनी घेणे आवश्यक आहे.

१३. गणवेश पात्र सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांनाच गणवेशाचे वाटप होणे आवश्यक आहे.त्यानुषंगाने योग्य नियोजन करुन गणवेश योजनेसाठी मंजूर असलेल्या तरतूदीचा विनियोग करण्यात यावा.